# मुंबई विद्यापीठ

**विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निवडणूकीसाठी प्राचार्य/संचालक, व्यवस्थापन प्रतिनिधी आणि विभाग प्रमुख या मतदार संघाच्या दुरूस्ती मतदार याद्या प्रसिध्द करणेबाबत.**

## जाहीर प्रकटन

**क्र.नि.वि./आय.सी.डी/२०२३-२४/०४.**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम २८(२)(ण)[28(2)(o)] अन्वये संलग्न, संचालित व स्वायत्त महाविद्यालयांचे १० प्राचार्य/संचालक, कलम २८(२)(त)[28(2)(p)] अन्वये संलग्न महाविद्यालये किंवा परिसंस्थेच्या ०६ व्यवस्थापनाचे प्रतिनिधी आणि कलम ४०(२)(ग)[40(2)(c)] अन्वये महाविद्यालयातील/ परिसंस्थातील ०३ विभाग प्रमुख अभ्यासमंडळावर निवडून देण्याची तरतुद आहे.

महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेले सन २०१७ चे एकरूप परिनियम क्र. १ मधील मुद्या क्र. ८ मधील तरतुदीनुसार तयार करण्यात आलेल्या प्राचार्य/संचालक, व्यवस्थापन प्रतिनिधी आणि विभाग प्रमुख यांच्या तात्पुरत्या मतदार याद्या तसेच अपात्र ठरलेल्या अर्जांच्या याद्या (कारणासहीत) **क्र.नि.वि./आय.सी.डी/२०२२-२३/३८१, दिनांक ०६ मार्च, २०२३** रोजी विद्यापीठाच्या https://mu.ac.in या संकेतस्थळावरील **Election 2022** या लिंकवर किंवा https://mu.eduapp.co.in या संकेतस्थळावर Voter List या सदराखाली (Tab) प्रसिध्द करण्यात आली होती. सदर तात्पुरत्या मतदार यादीवर दिनांक ११ मार्च, २०२३ पर्यंत आक्षेप मागविण्यात आले होते. त्यावरील आक्षेपांची नोंद घेऊन दुरूस्त मतदार यादी विद्यापीठाच्या https://mu.ac.in या संकेतस्थळावरील Election 2022 या लिंकवर किंवा https://mu.eduapp.co.in या संकेतस्थळावर Voter List या सदराखाली (Tab) प्रसिध्द करण्यात येत आहे. तसेच दुरूस्ती मतदार यादी प्रसिध्द झाल्याबद्दलची माहिती संक्षिप्त संदेश (SMS) द्वारे संबंधितांना कळविण्यात येत आहे.

पुढे आपणांस असे कळविण्यात येत आहे की, सदर दुरूस्ती मतदार यादीमध्ये वगळलेल्या किंवा चुकीच्या कोणत्याही नोंदी निदर्शनास आल्यास सदर नोंदीबाबत **मंगळवार, दि. ०४ एप्रिल, २०२३ ते शनिवार, दि. ०८ एप्रिल, २०२३** पर्यंत स्पष्टीकरणासह विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने मा. कुलगुरूंना अपिलद्वारे निदर्शनास आणून द्यावयात. ऑनलाईन पध्दती व्यतिरिक्त इतर कोणत्याही पध्दतीने मा.कुलगुरूंकडे अपील करू नये. इतर पध्दतीने मा.कुलगुरूंकडे अपील केल्यास त्याची नोंद घेतली जाणार नाही.

**सदर नोंदी मा. कुलगुरूंच्या निदर्शनास आणून देण्याची ऑनलाईन पध्दत खालीलप्रमाणे आहे.**

१. विद्यापीठाच्या https://mu.ac.in या संकेतस्थळावरील Election 2022 या लिंकवर किंवा https://mu.eduapp.co.in या संकेतस्थळावर जाऊन निवडणूकीच्या सॉफ्टवेअरमधील **Login/Registration** या **Tab** ला **Select** करावे.

२. संबंधीतांनी आपल्या **Login** मध्ये जाऊन तेथे उपलब्ध करून दिलेल्या **Add Grievance** या **Tab** वर **Click** करून तेथील रकान्यामध्ये सदर बाब स्पष्टीकरणासह नोंदवावी. सदर स्पष्टीकरणाबाबत असणारे कागदपत्रे दिलेल्या संबंधीत जागेवर अपलोड करावेत.

स्वाक्षरीत/-
(प्रा. सुनिल भिरुड)
प्रभारी कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी

दिनांक : ०३ एप्रिल, २०२३
ठिकाण : मुंबई - ४०० ०३२.